खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### मराठी विभाग – पुस्तक भेट उपक्रम

लोकमत



महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली.

### विद्यार्थ्यांना वाचकवीर पुरस्कार देणार : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

**मन आणि बुद्धी संवेदनशील बनणे गरजेची**

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : संस्कारक्षम वयातील विद्यार्थ्यांवर माणुसकीचा, विवेकाचा संस्कार होण्यासाठी वाचनसंस्कृती आवश्यक असून समृद्ध वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मराठी विभागाच्या माध्यमातून वाचकवीर पुरस्कार देणार असल्याची घोषणा खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केली. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयस्तरीय निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. शिल्पा जगताप उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांची मन आणि बुद्धी संवेदनशील बनणे गरजेची असून त्यासाठी समृद्ध व सकस वाचन हा पर्याय आहे. आहाराप्रमाणे आपले वाचन चौरस असले की, व्यक्तिमत्त्वाचा विकास निकोप होतो, यासाठी विद्यार्थ्यांना वाचनसंस्कृती रुजविण्याचे आवाहन त्यांनी केले.

**२०० विद्यार्थी स्पर्धेत सहभागी**

माझे आनंद पर्यटन या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थी सहभागी झाले. त्या सर्व विद्यार्थ्यांना मराठी विभागाच्या वतीने दिवाळी अंक व पुस्तके भेट देण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर प्रास्ताविक व आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Oct 31, 2023
Powered by: erelego.com

र २०२३ राष्ट्रसंचार १०

याने एका व्यक्तीची १३ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना
ाधीत मुळशी तालुक्यातील मारुंजी येथे घडली. या प्रकरणी ३२ वर्षीय व्यक्तीने
ादि दिली आहे. त्यानुसार दोन महिलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात

» Selected



## विद्यार्थ्यांना वाचकवीर पुरस्कार देणार : अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील

**राजगुरूनगर :** संस्कारक्षम वयातील विद्यार्थ्यांवर माणुसकीचा, विवेकाचा संस्कार होण्यासाठी वाचनसंस्कृती आवश्यक असून समृद्ध वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मराठी विभागाच्या माध्यमातून वाचकवीर पुरस्कार देणार असल्याची घोषणा खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केली. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयस्तरीय निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तकभेट कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडे-पाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. शिल्पा जगताप उपस्थित होते. अ‍ॅड. बुट्टे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांची मन आणि बुद्धी संवेदनशील बनणे गरजेची असून त्यासाठी समृद्ध व सकस वाचन हा पर्याय आहे. आहाराप्रमाणे आपले वाचन चौरस असले की व्यक्तिमत्त्वाचा विकास निकोप होतो, यासाठी विद्यार्थ्यांना वाचनसंस्कृती रुजविण्याचे आवाहन त्यांनी केले. "माझे आनंद पर्यटन" या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थी सहभागी झाले. त्या सर्व विद्यार्थ्यांना मराठी विभागाच्या वतीने दिवाळी अंक व पुस्तके भेट देण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर प्रास्ताविक व आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

पुढारी

## संक्षिप्त



निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांसह मान्यवर.

### विद्यार्थ्यांना वाचकवीर पुरस्कार देणार

**राजगुरुनगर :** संस्कारक्षम वयातील विद्यार्थ्यांवर माणुसकीचा, विवेकाचा संस्कार होण्यासाठी वाचनसंस्कृती आवश्यक आहे. समृद्ध वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मराठी विभागाच्या माध्यमातून वाचकवीर पुरस्कार देणार असल्याची घोषणा खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केली. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयस्तरीय निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा.किशोर लांडेपाटील, डॉ. शिल्पा जगताप उपस्थित होते. ॲड.बुट्टे पाटील म्हणाले, आहाराप्रमाणे आपले वाचन चौरस असले की, व्यक्तिमत्त्वाचा विकास निकोप होतो. यासाठी विद्यार्थ्यांना वाचनसंस्कृती रुजविण्याचे आवाहन त्यांनी केले. 'माझे आनंद पर्यटन' या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थी सहभागी झाले. त्या सर्व विद्यार्थ्यांना मराठी विभागाच्या वतीने दिवाळी अंक व पुस्तके भेट देण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**